Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2512I10VXIIIP0010
e-ISSN No. 2394-8426
Monthly Issue
DEC-2025
Issue–XII, Volume–XIII

# प्राचीन महाराष्ट्रातील व्यापारी मार्ग

**डॉ. सारंग विनायक घारपुरे,**
सहा. प्राध्यापक, विलिंग्डन कॉलेज, सांगली.

**गोषवारा** - नागरीकरणाच्या प्रक्रियेत कृषी अधिशेष उत्पादनासोबतच अंतर्गत व बाह्य व्यापाराची भूमिका देखील महत्वाची असते. भारतात इ.स.पू. सहाव्या शतकानंतर गतिमान झालेल्या नागरीकरणाच्या प्रक्रियेतदेखील अंतर्गत व बाह्य व्यापाराची भूमिका महत्वाची होती. या व्यापाराला आवश्यक दळणवळणासाठी पायाभूत सुविधांचा विकास होणे आवश्यक होते. या पायाभूत सुविधा व्यापारी मार्गांच्या स्वरूपात विकसित झाल्याचे दिसून येते. व्यापारी मार्ग व नागरी वसाहती यांच्या विकासात अन्योन्य संबंध असल्याचे देखील दिसून येते. महाराष्ट्रात देखील या व्यापारी मार्गांचा विकास आणि नागरी वसाहती यांच्यासंदर्भात शोध येथे घेण्यात आला आहे.

**शोध समस्या** - इ.स.पू. सहाव्या शतकात उत्तर भारतात प्रारंभ झालेल्या दुसऱ्या नागरीकरणाच्या प्रक्रियेचा प्रभाव विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील प्रदेशात दिसण्यास साधारणपणे दोन ते तीन शतकांचा कालावधी जावा लागला. इ.स.पू. तिसऱ्या शतकानंतर अनुकूल नैसर्गिक स्थिती व संसाधने, राज्यसंस्थेचे पाठबळ यासारख्या कारक घटकांमुळे महाराष्ट्राची परिस्थिती आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आदर्श बनली होती. व्यापारी मार्गांचा विकास झाल्यामुळे महाराष्ट्रात समुद्रमार्गाने आंतरराष्ट्रीय व्यापार सुरू होऊन महाराष्ट्रात आर्थिक समृध्दी आली होती. महाराष्ट्रातील बहुतांश स्थानांच्या नागरीकरणासाठी याच आंतरराष्ट्रीय व्यापाराची भूमिक महत्वाची होती. प्राचीन कालखंडात महाराष्ट्र आर्थिक दृष्ट्या समृध्द होण्यासाठी या व्यापारी मार्गांनीच मोठी भूमिका बजावली होती. व्यापारी मार्ग व त्या निकटच्या बौध्द लेण्यांचे महत्व आणि आंतरराष्ट्रीय व्यापार याविषयासंदर्भात अनेक अभ्यासकांनी यापूर्वी चर्चा केल्याचे दिसून येते. या लेण्यांसोबत निकटच्या नागरी वसाहतींसंदर्भात देखील चर्चा अभ्यासकांच्या द्वारे झाली असली तरी तत्कालीन आलेखात उल्लेख असणाऱ्या अनेक नागरी वसाहतींचे सद्यकालीन स्थान स्पष्ट होत नसल्याने या संदर्भात नवीन संशोधन होत राहणे गरजेचे वाटते. त्यामुळे या व्यापारी मार्गांचे व नागरी वसाहतींचे अस्तित्व यावर प्राथमिक साधनांच्या आधारे पुन्हा एकदा दृष्टीक्षेप टाकण्यात आला आहे.

**मर्यादा व शोधपध्दती -**

प्रस्तुत शोधनिबंधाची मर्यादा निश्चित करताना सध्याचे महाराष्ट्र राज्य ही भौगोलिक सीमा निश्चित केली गेली आहे. कालमर्यादा निश्चित करताना इ.स.पू. सहावे शतक ते इ.स.सहावे शतक असा बाराशे वर्षाच्या

e-ISSN No. 2394-8426
Monthly Issue
DEC-2025
Issue–XII, Volume–XIII
https://doi.org/10.69758/GIMRJ/2512I10VXIIIP0010

कालखंडाचा विचार करण्यात आला आहे. या शोधनिबंधासाठी ऐतिहासिक शोधपध्दतींचा अवलंब करण्यात आला आहे, आणि माहिती संकलनासाठी मुख्यते प्राथमिक संदर्भ साधनांचा आधार घेण्यात आला आहे. प्राथमिक संदर्भ साधनांमध्ये पुरातत्वीय उत्खननाचे अहवाल, आलेख, ताम्रपट, लेणी, घाटरस्ते यांचा आधार घेण्यात आला आहे. या व्यतिरिक्त तत्कालीन साहित्याचा देखील आधार घेण्यात आला आहे.

**महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थितीचे वर्णन**

महाराष्ट्रातील व्यापारी मार्गांची माहिती घेण्यासाठी प्रथम महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती समजून घेणे आधी गरजेचे वाटते. महाराष्ट्र दक्खन पठाराच्या पश्चिमेकडील भागात स्थित असून विवर्तनीय हालचालींमुळे राज्याचे प्रमुख तीन भाग झाल्याचे दिसते. विवर्तनीय हालचालींमुळे झालेली विभंग रेषा स्वरूपात अस्तित्वात असणार पश्चिम घाट, सागरी किनारी प्रदेश आणि पूर्वेकडे असणारा दक्खनचा पठारी प्रदेश हे तीन प्रमुख विभाग आहेत. यापैकी पश्चिम घाट व अरबी समुद्राच्या दरम्यान चिंचोळ्या किनारपट्टीचा प्रदेश असून हा प्रदेश 'कोकण' म्हणून ओळखला जातो. पश्चिम घाटाचा प्रदेश महाराष्ट्रात 'सह्याद्री पर्वतरांग' म्हणून ओळखला जातो. सह्याद्रीच्या पूर्वेकडील पठारी प्रदेश 'देश' म्हणून ओळखला जातो. देश हा प्रदेश महाराष्ट्राची मुख्य भूमी असून, सह्याद्री पर्वतरांगांमध्ये उगम पावणाऱ्या पूर्ववाहिनी नद्या येथून वाहतात. सह्याद्रीपर्वताला लंबरूप असणाऱ्या तीन प्रमुख पर्वतरांगांनी या नद्यांची खोरी विभक्त केली आहेत. या पर्वतरांगा व नद्यांची खोरी यामुळे देश विविध उपविभात विभागला आहे. यापैकी गोदावरी खोऱ्याने महाराष्ट्र राज्याचा जवळपास ५० टक्के भाग व्यापला आहे. याव्यतिरिक्त कृष्णा नदीचे खोरे व तिची उपनदी असणारे भीमा नदीचे खोरे हे दोन स्वतंत्र उपविभाग आहेत. महाराष्ट्राच्या उत्तरेला तापी-पूर्णा नदीचे खोरे स्थित असून, या नद्या मात्र पूर्ववाहिनी असून त्या विंध्यपर्वतरांगांमध्ये उगम पावतात. देशाचा प्रदेशाचा 'मावळ' हा अन्य एक उपविभाग असून तो सह्याद्रीच्या पर्वताच्या पूर्व आडोशाला स्थित आहे. महाराष्ट्राच्या या भौगोलिक स्थितीचा व्यापारी मार्ग व नागरीकरण विकासासंदर्भातील भूमिका महत्वाची आहे.

**प्राचीन व्यापारी मार्ग व निकटच्या नागरी वसाहती**

महाराष्ट्राच्या विविध भागात प्राचीन व्यापारी मार्ग अस्तित्वात असल्याचे अवशेष आढळून आले आहेत. या प्राचीन अवशेषांच्या आधारे व्यापारी मार्ग व निकट असणाऱ्या प्राचीन वसाहती यासंदर्भात चर्चा खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

भारतीय इतिहासातील पथपध्दतीसंदर्भात विश्लेषण विविध अभ्यासकांनी केले आहे. भारतीय पथपध्दतीचा विचार करता, उत्तरापथ आणि दक्षिणापथ या प्रमुख पथांचा उल्लेख येतो. यापैकी दक्षिणापथ पूर्व वैदिक कालखंडापर्यंत विशेष वापरात असल्याचा उल्लेख नाही, उलट या स्थानी बहिष्कृत समाजाला पाठवले

https://doi.org/10.69758/GIMRJ/2512I10VXIIIP0010

जात असल्याचे ऋग्वेदातील उल्लेखावरून समजते.[i] त्यामुळे पूर्व वैदिक कालखंडापर्यंत महाराष्ट्र व उत्तर भारत विशेष संबंध आल्याचे दिसत नाही. उत्तर वैदिक कालखंडात मात्र उत्तस भारत आणि विदर्भ यांच्यात संबंध स्थापन झाल्याचे दिसून येतात. वैदिक समाजाकडून दक्षिणापथाचा वापर काहीप्रमाणात होत असल्याचे संकेत या संबंधातून मिळतात. याशिवाय महाभारतातील सहदेवाच्या दिग्विजयाच्या वर्णनात कऱ्हाडचा उल्लेख आहे तसेच रामायणात देखील महाराष्ट्रातील काही प्रदेशाचा उल्लेख येतो. मात्र ही वर्णने प्रक्षिप्त असल्याचे त्यातील पाखंड संप्रदाय व कालमुख संप्रदाय यांच्या उल्लेखावरून लक्षात येते.[ii] महाराष्ट्रातील पथपध्दतीचा प्रथम स्पष्ट उल्लेख सुत्तनिप्पात या बौध्द साहित्यातून मिळताना दिसतो. इ. स. पू. सहाव्या शतकाच्या सुमारास उत्तर भारतातील नागरीकरण बहरून आले होते. महराष्ट्रात नागरीकरणाची प्रक्रियेचा वेग सातवाहन कालखंडापासून वृध्दींगत झालेला दिसतो. मौर्य शासकांनी भारताच्या सर्व भागात आपले साम्राज्य स्थिर केल्यानंतर राबवलेले धोरण हे व्यापारासाठी अनुकूल स्वरूपाचे होते. अशोकाच्या कालखंडात या पायाभूत सुविधांच्या विकासाचे धोरण विशेषपणे राबवले गेल्याचे त्याच्या आलेखातून दिसून येते.[iii]

सुत्तनिप्पातामधील बावरीच्या कथानकात त्याचे शिष्य बुद्धाच्या भेटीसाठी जाताना त्यांच्या मार्गाचे वर्णन आले आहे. पैठणपासून - माहिष्मती - उज्जैनी - विदीशा - कौशांबी -कुशीनारा मार्गे वैशालीपर्यंत हे शिष्य गेल्याचे समजते. या कथेकडे महाराष्ट्राच्या प्रारंभिक इतिहासकाळात नागरीकरणाची झालेली सुरूवात या दृष्टीने बघितले जाते. या कालखंडात उत्तर भारताचा महाराष्ट्राशी संबंध आल्याचे उर्ध्व गोदावरी खोऱ्यात आढळलेल्या इ.स.पू. पाचव्या शतकानंतरच्या उत्तरेतील काळया झिलाईच्या चमकदार खापरांवरून (N. B. P. W.) मुळे निश्चित झाले आहे.[iv] सांकलिया यांच्या मते बौध्द भिक्खूंसोबत ही भांडी महाराष्ट्रात आली असावीत.[v] पैठण ते माहेश्वर मार्गावरील प्रकाशा, बहळ या स्थानी उत्खनन झालेले असून त्या उत्खननात सापडलेल्या अवशेषांच्या आधारे या स्थानी सातवाहनपूर्व कालखंडापासून वसाहतींचे अस्तित्व असल्याचे सिध्द होते. यापैकी प्रकाशा या स्थानी ताम्रपाषाण कालखंडात देखील वसाहत होती. त्याच ठिकाणी पुन्हा आद्य ऐतिहासिक काळात देखील वसाहत असल्याचे दिसते.[vi] या व्यतिरिक्त महाराष्ट्रातून उत्तर भारतात जाणाऱ्या प्राचीन मार्गावर मध्यप्रदेशातील कासारवाड आणि नवदातोली यास्थानी देखील बौध्द स्तुपाचे अवशेष प्राप्त झाले आहेत. हा मार्ग मुख्यत्वे उत्तर महाराष्ट्रातून दक्षिण पूर्व असा जातो.

उत्तर भारताकडे जाणाऱ्या या मार्गांव्यतिरिक्त अन्य काही मार्गांचे देखील अस्तित्व दिसून येते. गुजरात येथील भरूच हे या कालखंडातील महत्वाचे बंदर असून थेरीगाथेत या स्थानाचा उल्लेख आहे. पेरीप्लस ऑफ एरिथ्रियन सी या ग्रंथातील उल्लेखानुसार पैठण व तगर या दोन्ही स्थानांचा भरूच सोबत व्यापार होत असे. भरूच-पैठण-तगर या मार्गाच्या दरम्यान देखील प्रकाशा हे स्थान येते. या व्यतिरिक्त भरूच कडून विदर्भात

https://doi.org/10.69758/GIMRJ/2512I10VXIIIP0010
e-ISSN No. 2394-8426
Monthly Issue
DEC-2025
Issue–XII, Volume–XIII

जाणारा मार्ग देखील प्रकाशा येथूनच जात असल्याने हे महत्वाचे स्थान आहे. प्रकाशासारखेच बहळ हे स्थान देखील या व्यापारी मार्गावरील महत्वाचे स्थान आहे. तेर-भरूच मार्गाव्यतिरिक्त बहळ या स्थानापासून विदर्भातील पौनी, पवनार, कौंडिण्यपूर या वसाहतींकडे जाण्याचा मार्ग असल्याचे दिसते. या मार्गाच्या निकटच पितळखोरे ही लेणी असल्याने प्राचीन कालखंडात हा मार्ग वापरात असावा असे अनुमान करता येते. याच अनुमानित मार्गावर भोन हे बुलढाणा जिल्ह्यातील स्थान असून उत्खननात स्तुपाचे अवशेष प्राप्त झाले असून हा स्तूप इ.स.पू. तिसऱ्या शतकातील असावा असे अभ्यासकांचे मत आहे.[vii]

भरूच व्यतिरिक्त सोपारा हे बंदर देखील इ.स.पू. सहाव्या शतकात प्रसिध्द असल्याचे बौध्द साहित्यातील उल्लेखावरून समजते. सोपारा व भरूचच्या दरम्यान डहाणू हे सागरी किनाऱ्यावरील एक महत्वाचे स्थान असून, डहाणूचा उल्लेख नाशिक येथील लेण्यांमधील आलेखात देखील आला आहे. या आलेखात उषावदातने या दोन वसाहतींना जोडणाऱ्या बोटीची सेवा निशुल्क केल्याचा उल्लेख आहे.[viii] थलघाट हा सोपारा, डहाणू, चिंचणी या बंदरांना नाशिक या महत्वाच्या नगराशी जोडत असल्यामुळे महत्वाचा आहे. याशिवाय डहाणू चिंचणीकडून नाशिककडे कासाखुर्द, डेंगातिची, जव्हार, त्र्यंगलवाडी, श्रीघाट, त्र्यंबक मार्गे जाता येते. या परिसरात काही वर्षांपूर्वी डेक्कन कॉलेजच्या प्राध्यापकांनी उत्खनन केले होते त्यात त्यांना नाशिकला आढळलेल्या लाल-काळया भांड्यांचे अवशेष मिळाले आहेत.[ix] या परिसरातील त्र्यंगलवाडी येथे लेणी स्थापत्य बघायला मिळते. नाशिक परिसरात इ.स. दुसऱ्या शतकापर्यंत नागरी वसाहतीचे अवशेष प्राप्त झाले आहेत. नाशिक निकटच बौध्द लेण्यांचे देखील अवशेष प्राप्त झाले आहेत. या लेण्यातच सातवाहन व क्षत्रप शासकांच्याद्वारे देण्यात आलेल्या दानांचे उल्लेख येथील आलेखात आढळतात. नाशिक पासून पूर्वेकडे प्रवरपूर (पवनार) कडे जाण्याचे दोन मार्ग दिसून येतात त्यापैकी एक मार्ग वेरूळच्या लेणी-भोकरदन मार्गे तर दुसरा पितळखोरे-अजंठा लेणी मार्गे जात असल्याचे अनुमान करता येते.

पेरिप्लस ऑफ एरिथ्रियन मधील वर्णनानुसार सातवाहन शासकांनी भरूच ऐवजी कल्याण या बंदराचे महत्व वृध्दिंगत व्हावे यासाठी प्रयत्न केल्याचे समजते. कल्याणच्या विकासासोबतच नाणेघाटाचा विकास देखील सातवाहन शासकांनी केला असल्याचे अनुमान येथील आलेखांच्या आधारे करू शकतो. पैठण या महत्वपूर्ण नागरी वसाहत या घाटामुळे पश्चिमी सागराशी जोडली जाते. नाणेघाटापासून निकट असणाऱ्या जून्नर येथे देखील नागरी वसाहत असल्याचा उल्लेख आढळतो. तसेच अगदी अलीकडे कोतूळ या स्थानी देखील डेक्कन कॉलेज द्वारे उत्खनन करण्यात आले असून त्या ठिकाणाचा देखील व्यापारी मार्गाशी असलेला संबंध दिसून आला आहे. या व्यतिरिक्त नेवासा हे एक महत्वपूर्ण स्थान असून या ठिकाणी सुध्दा रोमन मृदभांडी सापडली आहेत. पैठणपासून पूर्वेकडे गोदावरी निम्न खोऱ्यात जाणाऱ्या मार्गाबद्दल सध्या तरी माहिती उपलब्ध नाही. पैठण हे

https://doi.org/10.69758/GIMRJ/2512I10VXIIIP0010

नगर दक्षिणेकडे तेर व उत्तरेकडील भरूच कडे या नगरांना जोडले गेले असल्याचे दिसून येते.

मंदाड, चौल ही बंदरे बोरघाट, खंडाळा माध्यमातून देशासी जोडलेले आहेत. या परिसरात अनेक बौध्द लेण्यांचे अस्तित्व बघावयास मिळते. बेडसा, कार्ले, भाजे, कोंडाणे, शेलारवाडी हे प्रमुख लेणीसमुह परिसरात पहावयास मिळतात. या विविध लेण्यांमधील आलेखांवरून या ठिकाणाचा संबंध धेनुकाकट,[x] सोपारा,[xi] वैजयंती (वनवासी),[xii] नाशिक[xiii] यांचा संबंध असल्याचे दिसते. यापैकी धेनुकाकट या स्थानाचा शोध घेण्याचा प्रयत्न अनेक संशोधकांनी केला आहे, मात्र या स्थानाची ओळख स्पष्टपणे सिध्द झालेली नाही. हे स्थान या परिसरातच कुठेतरी असावे असे काही अभ्यासकांचे मत आहे. त्यासाठी सखोल संशोधन होणे आवश्यक वाटते. मात्र या विविध वसाहतींच्या असणाऱ्या उल्लेखामुळे हा प्रदेश विशेष वर्दळीचा असावा असे म्हणू शकतो. या लेण्यांना जोडणारे मार्ग नेमके स्पष्ट होत नसले तरी काही पायवाटांच्या व अवशेषांच्या आधारे या मार्गांचा अंदाज करता येऊ शकतो. त्यापैकीच एक पायवाट कर्जत पासून कोंडिवडे या गावाला जाण्यासाठी पायवाटेच्या स्वरूपात स्थानिक लोक वापरतात. त्या मार्गावर कोंडाणे ही महत्वाची आणि कांब्रे, पाल, उकसान ही अपूर्णावस्थेतील लेणी आहेत. भीमा खोऱ्यातील वसाहतींना जोडण्यासाठी हा प्रदेश महत्वाचा आहे, मात्र सध्या या परिसरात असणाऱ्या धरणांमुळे या मार्गांचा व वसाहतींचा शोध घेणे शक्य नाही. या व्यतिरिक्त वरंधा या घाटाचा वापर देखील होत असावा असे अनुमान शिरवळ आणि वाई प्रदेशात आढळून आलेल्या लेण्यांवरून अनुमान करता येते.

मंदाड येथून जवळ कुडा या लेण्यात कऱ्हाडच्या लोहार श्रेणीने दान दिल्याचा उल्लेख आलेखात आढळतो. त्यामुळे कुंभार्ली घाट आणि कऱ्हाडच्या आगाशिव लेण्यांशी देखील संबंध असल्याचे दिसून येते. यामुळे कऱ्हाडचा संबंध पश्चिमी सागरी किनाऱ्याशी असल्याचे समजते. कराडपासून पूर्वेला जाणाऱ्या मार्गासंदर्भात माहिती उपलब्ध नसली तरी काही अवशेषांच्या आधारे अनुमान करू शकतो. कराडच्या पूर्वेला खानापूर नजीक विष्णूकुंडीन घराण्यातील माधववर्मन जनाश्रय द्वितीय याचा ताम्रपट मिळाला आहे.[xiv] विष्णूकुंडीन घराण्याचे राज्य आंध्र प्रदेशात विस्तारले होते, त्यामुळे आंध्रातील नगरांचा कऱ्हाडमधील नगरांशी संबंध असू शकतो. कऱ्हाड पासून जवळच दक्षिणेला वाटेगाव येथे सातवाहनकालीन नाण्यांचा साठा सापडला होता.[xv] वाटेगावपासूनजवळ ऐतवडे बुद्रूक या गावाजवळ काही दगडाची वर्तुळ सापडली आहेत. सचिन पाटील व पी.डी.साबळे यांनी या दगडी वर्तुळांना चक्रव्यूहासारख्या रोमन कोड्यांशी (labyrinth) संबध असल्याचे सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकारची दगडी वर्तुळे तासगाव-शिरढोण रस्त्यावरील मळणगाव या गावाजवळ देखील आहेत, त्याचाही संबंध रोमन कोड्यांशी असावा असे त्यांचे मत आहे.[xvi] मात्र यासंदर्भात विस्तृत संशोधनाची आवश्यकता आहे असे येथे नमूद करावे असे वाटते.

कोल्हापूर हे स्थान आंबा, फोंडा, अणुस्कूरा, बावडा या विविध घाटांच्या माध्यमातून जयगड, विजयदुर्ग, देवगड या दक्षिण कोकणातील प्रमुख वसाहतींशी जोडले गेले आहे. कोल्हापूरकडून आंबा घाटाकडे जाण्याच्या परिसरात पोहाळे येथे लेणी आहेत. तसेच मसाईच्या पठारावर देखील लेणी आढळून आली आहेत. कोल्हापूर येथे ब्रह्मपुरी नजीक झालेल्या उत्खननात काही ब्रॉन्झच्या काही मूर्ती सापडल्या होत्या. या ब्रॉन्झच्या मूर्तींमध्ये पॉसिडॉन या रोमन सागरदेवतेची मूर्ती सापडली आहे. या ठिकाणी एका घराच्या स्थापत्याचे अवशेष देखील आढळले आहेत, ही स्थापत्य शैली उपखंडात अन्यत्र आढळणाऱ्या शैलीहून पूर्णत: भिन्न आहे. या शिवाय दोन खेळण्यातील बैलगाडया आढळल्या आहेत, तसेच हत्तीवर स्वार चार जणांची ब्रॉन्झची प्रतिमा देखील मिळाली आहे.[xvii] कार्ले येथील स्तंभशीर्षांवर देखील याच प्रकारच्या हत्तीवर स्थित युगुलांची शिल्पे आढळली आहेत. त्यामुळे कोल्हापूर-कार्ले दरम्यानचा मार्ग देखील दळणवळणासाठी वापरला जात असावा, हा देखील अंदाज करता येतो. कोल्हापूरातून पूर्वेकडून जाणारा रस्ता मिरज मार्गे कर्नाटककडे जातो, या मार्गावर अलिकडेच कुकटोळी गावाजवळच्या डोंगरावर बौध्द लेण्यांचे अवशेष मानसिंग कुमठेकर यांना प्राप्त झाले आहेत.[xviii] या लेण्यांची दुर्दशा नैसर्गिक कारणांनी झाल्याचे दिसते. मात्र त्यामुळे हा मार्ग प्राचीन कालखंडात वापरला जात असल्याचा निष्कर्ष काढू शकतो. कोल्हापूर नजीक बावडा घाट परिसरात देखील लेण्यांचे अवशेष प्राप्त होतात. आणि बावडा घाटाच्या पूर्वेकडे कोकणातील बाजूला सुरूवातीला ऐनारी नावाच्या गुहा ज्या मूलत: लेणी आहेत ती अंजनेय धनावडे यांनी प्रथम उजेडात आणली आहेत.[xix] बावड्याच्या निकट सांगशी या स्थानी देखील एक स्मारक शिलालेख आढळलेला असून त्याचा कालखंड इ. स. पाचव्या शतकातील मानला जातो.[xx] या सांगशीपासूनचजवळच पळसंबे येथे एकाश्म पाषाण मंदिर समुह बघायला मिळतो. प्रभूदेसाई यांच्या मते हे स्थापत्य इ. स. सहाव्या शतकाच्या पूर्वीचे आहे.[xxi] त्यामुळे बावडा-कोल्हापूर हा मार्ग पाचव्या शतकाच्या सुमारास वापरात असल्याचे समजते. देशांवरील या मार्गाव्यतिरिक्त कोकणातील अंतर्गत मार्गांचा देखील वापर होत असल्याचे कालिदासाच्या रघुवंश या रचनेवरून दिसून येते. कालिदासाने रघुच्या दिग्विजयाचे वर्णन केले आहे त्यामध्ये रघुराजा दक्षिण भारतातून किनारपट्टीवरून उत्तर कोकणात व पुढे भूमार्गानेच इराणकडे जातो असा उल्लेख आहे.[xxii] त्यामुळे कोकणात अंतर्गत व्यापारी मार्ग वापरले जात असावे असे दिसून येते.

**निष्कर्ष**

आतापर्यंत ज्या व्यापारी मार्ग व वसाहतींचे वर्णन करण्यात आले आहे, या व्यापारी मार्गांमध्ये सागरी किनारी प्रदेशातून अंतर्भूमीत जाणाऱ्या पश्चिमेकडून पूर्वेकडे जाणाऱ्या मार्गांची संख्या विशेषकरून दिसते. पश्चिमेकडून पूर्वेकडे जाणाऱ्या मार्गात कोकणातून सह्याद्रीच्या घाटमार्गांच्या साह्याने मावळ मार्गे महाराष्ट्रातील

प्रमुख नद्यांच्या खोऱ्यातून जाणारे मार्ग अस्तित्वात असल्याचे दिसते. दक्षिणेकडून उत्तरेकडे जाणाऱ्या मार्गांपैकी तेर-पैठण-भरूच या मार्गाचा उल्लेख तत्कालीन साधनांमधून स्पष्टपणे आला आहे. गोदावरी, भीमा खोऱ्यातील नागरी वसाहती या मार्गाने जोडल्या गेल्या आहेत. याचप्रकारे कार्ले येथील लेण्याचा संबंध दक्षिणेकडे कोल्हापूर, वनवासी आणि उत्तरेकडे नाशिक, सोपारा या वसाहतींशी असल्याचे आलेखातून समजते. त्यामुळे गोदावरी, भीमा, कृष्णा खोऱ्याच्या उर्ध्व स्थानी वसलेल्या मावळातील वसाहतींना जोडण्यासाठी मार्गांचे अस्तित्व असल्याचे दिसून येते.

**संदर्भ आणि टिपा**

---

i चित्राव सिध्देश्वर शास्त्री , ऋग्वेदाचे मराठी भाषांतर,१९९६, भारतीय चरित्रकोश मंडळ, पुणे, पृ., ६६३

ii Sukthankar V. S., The Mahabharat Sabhaparva, Bhandarkar Oriental Research Institute, Pune,1944, p.149

iii E. Hultzsch, Corpus Inscription Indicarum, Vol. 1, Inscriptions of Asoka, 1925, p. 70

iv Sen Aloka Parashar , Settlement and Local Histories of Early Deccan, 2020, Manohar Publication, p. 51

v सांकलिया ह. धी. व अन्य (सं.), महाराष्ट्रातील पुरातत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६ पृ. ६४

vi कित्ता

vii Deotare, B. C. (2006). Further Excavations at Bhon, Buldana District, Maharashtra *Bulletin of the Deccan College Research Institute*, *66/67*, pp.183–189., http://www.jstor.org/stable/42931445

viii Epigraphia Indica, Vol. VIII, p. 85

ix I. A. R., 2006-07, pg. 52

x Epigraphia Indica, Vol.,VII, p. 53

xi Ibid, p. 54

xii Ibid, p. 48

xiii Epigraphia Indica, Vol. X. Appenedix p.120

xiv देव शां. भा., १९८२, उपरोक्त, पृ. ३३९

---

[xv] मिराशी वा. वि., सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, १९७९, (इ - आवृत्ती) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. ४०

[xvi] Patil Sachin Bhagwan & Sabale P.D. , *New Discovery of Stone Labyrinths in Western Maharashtra, India* : report important new discoveries from India, Caerdroia 50 - the Journal of Mazes & Labyrinths

[xvii] Khandalwala Karl, Lalit Kala A Journal of Oriental Art Chiefly Indian, Lalit Kala Akademi, 1960, p.29-75

[xviii] कुमठेकर मानसिंग, सांगली जिल्ह्यातील बौध्द लेणी, सांगली, दिनांक, दै. तरूण भारत, ५ मे २०२३

[xix] Ganvir, S. (2020). Newly Discovered Buddhist Rock-cut Caves of Maharashtra: An Appraisal Proceedings-Rock-Cut Caves of Maharashtra .

[xx] Epigraphia Indica, XXVIII, p. 129-133

[xxi] Prabhudesai Yogesh, Archaeology of Religious Ideas at Kolhapur with special reference to Shaivism and Shaktism (9th century CE to 13th century CE), unpublished Ph. D. dissertation, Deccan College Post Graduate Research Institute, Pune, 2021, p.94

[xxii] मिश्र ज्वालाप्रसाद (सं.), रघुवंशमहाकाव्य, खेमराज श्रीकृष्णदास, मुंबई, १९०७, पृ. १२९ - १३१